

जबिंदा मैदानावर ९ ऑक्टोबर रोजी ९ वाजून ९ मिनिटे आणि ९ सेकंदांनी एकाच वेळी, एकाच स्वरात 'भक्तामर' या मंगलकारी स्तोत्राचे पठण करून विश्वशांतीचा शंखनाद


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१९, अंक-५ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## खोकल्याच्या सिरपमुळे बालकांचा मृत्यू

### खबरदारीसाठी राज्याने १८००-२२२-३६५ टोल-फ्री क्रमांक केला जारी!

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

मध्य प्रदेश आणि राजस्थानसह देशातील काही राज्यांमध्ये 'कोल्ड्रिफ' नावाच्या खोकल्याच्या सिरपमुळे काही लहान मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्यानंतर, महाराष्ट्र सरकारने तत्काळ खबरदारीची पावले उचलली आहेत. या सिरप मध्ये 'डायथिलीन ग्लायकॉल' नावाचे विषारी रसायन आढळल्याचा संशय आहे.



राज्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने तातडीने कठोर पाऊले उचलली आहेत. 'कोल्ड्रिफ' या कफ सिरपच्या एका विशिष्ट बॅचच्या (Batch No. SR-13) विक्रीवर, साठवणुकीवर आणि वितरणावर महाराष्ट्रात तत्काळ बंदी घालण्यात आली आहे.

माहिती देण्यासाठी टोल-फ्री क्रमांक

या संदर्भात कोणतीही माहिती देण्यासाठी, तसेच नागरिकांकडे जर या प्रतिबंधित बॅचचे सिरप आढळल्यास त्याची माहिती प्रशासनाला देण्यासाठी राज्याच्या ऋऊअ विभागाने टोल-फ्री क्रमांक आणि ईमेल आयडी जारी केला आहे. टोल-फ्री क्रमांक: १८००-२२२-३६५ नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, जर त्यांच्याकडे 'कोल्ड्रिफ' सिरपची Batch No. SR-13 ही आढळल्यास त्यांनी त्वरित वरील क्रमांकावर संपर्क साधावा.पालकांना महत्त्वाचे आवाहन- आरोग्य तज्ज्ञांनी पालकांना आवाहन केले आहे की, लहान मुलांना डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही कफ सिरप देऊ नये. विशेषतः पाच वर्षांखालील मुलांना खोकल्याचे सिरप देणे टाळावे. सर्दी-



खोकला झाल्यास डॉक्टरांच्या लेखी सल्ल्यानुसारच औषधोपचार घ्यावेत.

एफडीएने राज्यातील सर्व किरकोळ विक्रेते, घाऊक विक्रेते आणि रुग्णालयांनी तातडीने या विशिष्ट सिरपचा साठा गोठवण्याचे आदेश दिले आहेत. पुढील तपासणी अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## लाडकी बहीण योजना सुरूच राहणार - एकनाथ शिंदे

नाशिक : लाडकी बहीण योजना ही सुरूच राहणार असून बहिणींच्या तक्रारीसाठी शिवसेनेने स्वतंत्र कक्षाची स्थापना केली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नाशिकमधील खड्ड्यांचा प्रश्न देखील गांभीर्याने घेताना सांगितले की संबंधित अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात येणार आहे.

शिवसेना शिंदे पक्षाच्या वतीने रविवारी नाशिक मध्ये बुथप्रमुख कार्यशाळा व प्रमुख पदाधिकारी बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये बूथप्रमुखांना मार्गदर्शन करण्यात आले विविध प्रकारच्या सूचना देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, उपनेते अजय बोरस्ते यांच्यासह विविध मान्यवरांनी केल्यत्याप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.व्यासपीठावर मंत्री दादा भुसे, ज्येष्ठ नेते अजय बोरस्ते व अन्य नेते व्यासपीठावर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्याच्या विकासासाठी जनतेने महायुतीला विधानसभेत निर्विवाद बहुमत दिले. नागरिकांचा आमच्यावर पूर्णपणे विश्वास असल्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत देखील महायुतीचा विजय निश्चित आहे. कार्यकर्त्यांनी देखील आता अधिक वेगाने तयारी सुरू केली आहे. राज्यात लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असून , कोणत्याही भगिनींवर अन्याय होऊ नये यासाठी शिवसेनेने राज्यस्तरीय तक्रार निवारण मंच स्थापन केला आहे. राज्यातील नाशिक सह कोणत्याही अन्यायग्रस्त महिलेने तक्रार केल्यास न्याय देण्याचे काम शिवसेना करणार असल्याचा विश्वास देखील शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. यात कोणत्याही परिस्थितीत नाशिकसह राज्यात महायुतीचा भगवा फडकणारअसा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

## शिरूर तालुक्यात किरकोळ वादातून युवकाची क्रूरपणे हत्या; आरोपी गजाआड...



**कारेगाव (अट्टल मत प्रतिनिधी)**

'किरकोळ वाद... पण त्यातून उफाळलेला संताप... आणि शेवटी निर्दयी खून!' अशी थरकाप उडवणारी घटना शिरुर तालुक्यातील कारेगाव येथे घडली. एका किरकोळ धक्काबुक्कीतून सुरु झालेला वाद एवढा चिघळला की, अखेर निष्पाप युवाकाच जीव गेला आहे.

याबाबत रांजणगाव चखऊ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद शकील मोहम्मद हाजी तसेच त्याचा भाऊ सिध्दीकी मोहम्मद (रा. कारेगाव, मूळ नांदेड) यांचा ३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी दुचाकीचा धक्का लागल्याच्या कारणावरुन ओंकार वाळके व त्याच्या साथीदाराशी किरकोळ वाद झाला. मात्र, हा राग मनात धरुन दोघांनी ४ ऑक्टोबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास त्यांच्या घरात घुसून निर्दयी हल्ला चढवला. लाकडी दांडके, प्लास्टिक पाईप आणि हाताने झालेल्या मारहाणीत सिध्दीकीचा जागीच मृत्यू झाला तर शकील गंभीर जखमी झाला आहे. गुन्ह्या घडल्यानंतर दोन्ही आरोपी फरार झाले. पण रांजणगाव चखऊ पोलिसांनी विजेच्या वेगाने कारवाई करत अवघ्या दोन तासांत आरोपी ओंकार सिताराम वाळके आणि विजय ज्ञानेश्वर जगधने (दोन्ही रा. कोरेगाव) यांना जेरबंद केले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल, पुण्याचे अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, शिरुरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली रांजणगावचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, पोलिस उपनिरीक्षक शिवाजी मुंढे, निळकंठ तिडके, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलिस हवालदार ब्रम्हा पोवार, अभिमान कोळेकर, विजय सरजिने, वैजनाथ नागरगोजे, पोलिस कॉन्स्टेबल योगेश गुंड, गणेश वाघ, प्रविण पिठले, किरण आव्हाड यांनी कारवाई केली आहे.

संबंधित गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शिवाजी मुंढे हे करत आहेत. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या मोहम्मद शकील यांच्यावर उपचार सुरु असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पर्यटन क्षेत्रात जगभरात ९ कोटी नवीन नोकऱ्यांची निर्मिती ?

दिल्ली(वृत्तसंस्था): पुढील १० वर्षांत आंतरराष्ट्रीय प्रवास आणि पर्यटन क्षेत्र ९ कोटी नवीन नोकऱ्या निर्माण होतील, असे जागतिक प्रवास आणि पर्यटन परिषदेच्या (डब्ल्यूटीटीसी) अहवालात नमूद करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या प्रत्येक तीन नोकऱ्यांपैकी एक अशा पध्दतीने लोकसंख्याशास्त्रीय आणि संरचनात्मक बदलांमुळे ४.३ कोटींहून अधिक लोकांची कामगार कमतरता निर्माण होऊ शकते, असे २० अर्थव्यवस्थांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या 'फ्यूचर ऑफ द ट्रॅव्हल अँड टुरिझम वर्कफोर्स' या अहवालात म्हटले आहे.

ही परिषद प्रवास आणि पर्यटन उद्योगाच्या मुद्द्यांवर सरकारांसोबत काम करते आणि या क्षेत्राच्या आर्थिक आणि सामाजिक योगदानावर जागतिक अधिकार आहे. रोममधील २५ व्या डब्ल्यूटीटीसी ग्लोबल समिटमध्ये नुकताच प्रसिद्ध झालेला हा अहवाल व्यापक जागतिक संशोधनावर आधारित आहे, ज्यामध्ये व्यावसायिक नेत्यांचे मोठ्या प्रमाणात सर्वेक्षण आणि पर्यटन संस्थेच्या सदस्यांसह आणि इतर प्रमुख भागधारकांच्या सखोल मुलाखतींचा समावेश आहे. २०२४ मध्ये, प्रवास आणि पर्यटनाची मागणी पूर्वीपेक्षा जास्त होती.

या क्षेत्राचे जीडीपी योगदान ८.५ टक्क्यांनी वाढून १०.९ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सवर पोहोचले. जे २०१९ च्या पातळीपेक्षा ६ टक्क्यांनी जास्त आहे. प्रवासी पुरवठादारांनी २०.७ दशलक्ष नवीन नोकऱ्या निर्माण केल्या, ज्यामुळे जगभरात एकूण ३५७ दशलक्ष नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. पुढील दशकात, या क्षेत्रात ९ कोटी नवीन नोकऱ्या निर्माण होतील,असा अंदाज आहे. जे जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या प्रत्येक तीन निव्वळ नवीन नोकऱ्यांपैकी एक आहे, असे अहवालात म्हटले आहे. २०३५ पर्यंत, प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात कामगारांची जागतिक मागणी ४.३ कोटींहून अधिक लोक पुरवठ्यापेक्षा जास्त होईल, ज्यामुळे कामगारांची उपलब्धता आवश्यक पातळीपेक्षा १६ टक्क्यांनी कमी राहील.

पर्यटन क्षेत्रातील जागतिक नेते मानफ्रेडी लेफेबवरे यांना डब्ल्यूटीटीसीचे नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले, ते नोव्हेंबर २०२३ पासून संघटनेचे नेतृत्व करणारे ग्रेग ओ'हारा यांच्या जागा घेतील.इटालियन पर्यटन मंत्रालय, इटालियन राष्ट्रीय पर्यटन मंडळ, रोम नगरपालिका आणि लॅझिओ प्रदेश यांच्या भागीदारीत ही शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. दरवर्षी, डब्ल्यूटीटीसी १८४ देश/अर्थव्यवस्था आणि जगातील २८ भौगोलिक किंवा आर्थिक क्षेत्रांसाठी प्रवास आणि पर्यटनाच्या आर्थिक आणि रोजगार परिणामांवर अहवाल तयार करते.कामगार आव्हानांचा विश्लेषण केलेल्या २० प्रमुख अर्थव्यवस्थांवर परिणाम होईल, ज्यामध्ये चीन (१.६९ कोटी), भारत (१.१ कोटी) आणि युरोपियन युनियन (६४ लाख) या देशांचा समावेश आहे. जीडीपीनुसार जगातील टॉप १० सर्वात शक्तिशाली प्रवास आणि पर्यटन बाजारपेठांपैकी पाच देशांसह युरोप आंतरराष्ट्रीय पर्यटनात आघाडीवर आहे. मध्य पूर्व हा या क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रदेशांपैकी एक आहे, सौदी अरेबिया अजूनही वेगळे आहे, येणाऱ्या पर्यटकांच्या खर्चात वाढ होत आहे आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक विक्रमी पातळीवर पोहोचली आहे, असे अहवालात म्हटले आहे.

## संपादकीय

# सायबर गुन्ह्याचे तंत्र

आजच्या काळात सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक वापरकर्त्याने आपली वैयक्तिक माहिती जपून ठेवली पाहिजे आणि ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. करभरणेची तारीख उलटल्यानंतर प्राप्तिकर खात्याचा परतावा लोकांच्या खात्यात जमा होत असतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात, याबाबत सतर्क असायला हवे.

प्राप्तिकर खात्याकडून येणारा परतावा म्हणजे आर्थिक वर्षात भरलेला कर प्रत्यक्ष देय असलेल्या करापेक्षा जास्त असतो, तेव्हा सरकार परत करते ती अतिरिक्त रक्कम. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, तुम्ही सरकारला गरजेपेक्षा जास्त कर दिल्यास परत मिळणारी जास्तीची रक्कम. चुकून देय करापेक्षा जास्त कर भरल्यास, टीडीएस कपात जास्त झाल्यास, कार्यालय किंवा बँकेने उत्पन्नावर (उदा.पगार,व्याजाचे उत्पन्न) जास्त टीडीएस कपात केल्यास असा परतावा मिळतो. करबचतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती नंतर सादर केल्यास, कर गणनेमध्ये काही चूक झाल्यासही हे अनुभवायला मिळते. अशा वेळी मिळणारा परतावा बहुतेक वेळी थेट तुमच्या बँक खात्यात जमा केला जातो. अशा वेळी परतावा प्रक्रियेद्वारे प्राप्त होईल आणि लवकरच आपल्या खात्यात जमा होईल, असा इमेल किंवा मेसेज येतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात. यासाठी सतर्क असणे जरुरीचे आहे. हा एक प्रकारचा सायबर घोटाळा आहे, जिथे सायबर गुन्हेगार प्राप्तिकर विभागाचे अधिकारी असल्याचा बनाव करतात. कर परतावा मिळणार असल्यास किंवा करगणनेत काही चूक झाली, असल्याच्या खोट्या गोष्टी सांगून ते करदात्यांची गोपनीय आर्थिक माहिती मिळवतात. या प्रकारांना आळा घालणे महत्त्वाचे.

सहसा करदात्याला ईमेल किंवा इन्स्टंट मेसेजिंग ॲप्लिकेशनवरून एक मेसेज येतो, ज्यामध्ये तुमचा प्राप्तिकर परतावा थकीत आहे किंवा तुम्ही भरलेली कराची रक्कम चुकीची आहे किंवा प्राप्तिकर भरताना काही तरी चूक झाली आहे, असे दावे केलेले असतात. अशा मेसेजचा उद्देश करदात्याला घाबरवून तातडीने काही तरी करण्याची भावना निर्माण करणे हा असतो. मेसेजमध्ये एक लिंक असते, जी प्राप्तिकर विभागाच्या अधिकृत ईफायलिंग पोर्टलसारखी दिसते. करदात्याला प्राप्तिकर विभागाचे अधिकृत ॲप असल्याचा बनाव करून संबंधित सायबर गुन्हेगार एक एपिके फाईल डाऊनलोड करायला सांगतात, ज्याचा उपयोग प्राप्तिकराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी असल्याचे सांगितले जाते. एकदा करदात्याने त्या लिंकवर क्लिक केले किंवा बनावट ॲप इन्स्टॉल केले की ते एका बनावट वेबपेजवर किंवा इंटरफेसवर जातात, जे सरकारी प्लॅटफफॉर्मसारखे दिसते. इथे, त्यांना आपली बँक आणि आर्थिक माहिती तसेच वैयक्तिक माहिती भरण्यास सांगितले जाते. फसवणूक अधिक प्रभावी बनवण्यासाठी, घोटाळेबाज प्राप्तिकर विभागाचे अधिकारी किंवा हेल्पडेस्क प्रतिनिधी असल्याचे भासवून फोन करतात आणि करदात्याला बनावट ॲप इन्स्टॉल करण्यास किंवा लिंकवर क्लिक करण्यास आणि आवश्यक माहिती देण्यास सांगतात. एकदा आवश्यक माहिती मिळाली, की घोटाळेबाज त्याचा वापर अनधिकृत इलेक्ट्रॉनिक व्यवहार करण्यासाठी करतात.

असे गुन्हे सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे तज्ज्ञांकडून सातत्याने खबरदारीचे काही उपाय सांगितले जातात. पहिला म्हणजे सत्यता तपासणे. प्राप्तिकर विभागाकडून पाठवल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही ईमेलची सत्यता नेहमी तपासावी. अशा संपर्काचा स्रोत काय आहे, याकडे लक्ष द्यावे. शंका असल्यास अशा मेसेजला प्रतिसाद देणे टाळावे. अनोळखी लिंकवर क्लिक करू नये. या लिंक बनावट वेबसाइट्सकडे घेऊन जातात. सामान्यजनांनी आपली संवेदनशील माहिती कधीही शेअर करू नये. पासवर्ड, कार्ड नंबर यासारखी संवेदनशील माहिती कोणाशीही शेअर करू नये. कोणताही अधिकृत सरकारी विभाग फोनकॉल, मेसेज किंवा ईमेलद्वारे ही माहिती कधीही मागत नाही. प्राप्तिकराची नोटीस किंवा परताव्याच्या अलर्टसंबंधी कोणताही मेसेज आल्यास थेट अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपल्या खात्यात लॉग-इन करून मेसेजची सत्यता तपासावी. फोनची ऑपरेटिंग सिस्टीम आणि ॲप्स नियमितपणे अपडेट ठेवावे, जेणेकरून सुरक्षाविषयक त्रुटी दूर होतील. तसेच विश्वासार्ह अँटीव्हायरस किंवा मोबाईल सुरक्षा ॲपचा वापर करावा, ज्यात रिअल-टाइम संरक्षणाची वैशिष्ट्ये असतील.

सायबर गुन्हेगार आपले सावज कसे शोधतात हे इथे समजून घेणे म हत्त्वाचे ठरते. सायबर गुन्हेगार आपल्या लक्ष्याचा शोध घेण्यासाठी अनेक पद्धती वापरतात. यामध्ये आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. बरेचदा सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून लोकांना हेरले जाते. यामध्ये लोकांच्या मानसिकतेचा फायदा घेतला जातो. उदाहरणार्थ, ओळखीचा बहाणा करणे. गुन्हेगार कुटुंबातील सदस्य किंवा मित्र असल्याचा दावा करतात आणि माहिती मिळवतात. बरेचदा ते तुमच्या मनात तातडीची गरज किंवा भीती निर्माण करतात, जसे की तुमचे बँक अकाउंट बंद होणार आहे. बरेचदा सार्वजनिक माहिती आणि डेटा लीक केला जातो. आज काल लोक सोशल मीडियावर खूप माहिती शेअर करतात. गुन्हेगार या माहितीचा वापर करतात. अनेकदा बँक खाते, आधार, पॅनची माहिती सोशल मीडियावर पाठवली जाते. हे नक्कीच धोकादायक आहे. माहितीचा वापर करून ते पासवर्डचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतात. अनेकदा कंपन्यांच्या डेटाबेसमध्ये सायबर हल्ला होतो. त्यावेळी ग्राहकांची वैयक्तिक माहिती, जसे की ईमेल आयडी आणि पासवर्ड लीक होते. ही माहिती गुन्हेगार डार्क वेबवर विकत घेतात आणि नंतर दुसऱ्या हल्ल्यासाठी त्याचा वापर करतात. बरेचदा आपणच अशा गुन्हेगारांची शिकार होतो. काही व्यक्ती किंवा कंपन्यांची सायबर सुरक्षा कमकुवत असते. या व्यक्ती सर्वात सोप्या शिकार असतात. बरेचदा आपण ठेवलेले सोपे पासवर्ड फसवणुकीला कारण ठरतात. १२३४५६ किंवा यासारखे सोपे पासवर्ड वापरणाऱ्या लोकांना सहज लक्ष्य केले जाऊ शकते. जुन्या किंवा अपडेट न केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये अनेक कमतरता असतात. त्याचाही फायदा गुन्हेगार घेतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनेही सायबर गुन्हेगार आपले हल्ले अधिक प्रभावी आणि वेगवान बनवतात. एआयचा वापर ते विविध प्रकारे करतात.

# अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळास कायदेशीरदृष्ट्या कसे हाताळावे याचे केस कायदे शासनास मार्गदर्शक - डॉ. राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सद्य स्थिती अत्यंत भयावह असुन अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळस कायदेशीर दृष्ट्या सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शन करणारे निकाल दिले असुन अशा स्थितीस कसे हाताळावे याचे न्याय निवाडे व केस कायदे अत्यंत फायद्याचे ठरणार असल्याचे प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

त्यांनी नमुद केले की,विशेषतः अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळाला संबोधित करत नाही. त्याऐवजी, न्यायालये विद्यमान कायदेशीर चौकटींद्वारे हवामान बदलाच्या परिणामांना, जसे की अतिवृष्टी घटनांना हाताळतात. केस कायदा प्रामुख्याने आपत्ती व्यवस्थापना साठी जबाबदारी,अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानासाठी विमा दावे आणि पाण्यावरील मूलभूत हक्कांचे समर्थन करण्याशी संबंधित आहे. कायदेशीर युक्तिवादांवर प्रभाव टाकणारे वैज्ञानिक निष्कर्ष मुसळधार पाऊस आणि दुष्काळ यांच्यातील स्पष्ट संबंध प्रदान करतात. अति, तीव्र पावसामुळे 'फ्लॅश दुष्काळ' होऊ शकतो जिथे पाणी माती आणि भूजलात प्रवेश करण्याऐवजी आणि पुनर्भरण करण्याऐवजी वेगाने वाहून जाते असेही अभ्यासु प्रतिपादन जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

**भारतातील महत्त्वाचे केस कायदे** – स्वराज अभियान विरुद्ध भारतीय संघ (२०१६):या ऐतिहासिक प्रकरणात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दुष्काळाला सरकारच्या प्रतिसादासाठी जबाबदारीचे मानक स्थापित केले. न्यायालयाने आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत दुष्काळ ही एक आपत्ती आहे असा निर्णय दिला आणि केंद्र आणि राज्य सरकारांना मदत देण्यासाठी वेळेवर दुष्काळ जाहीर करण्याचे आदेश दिले.

**नर्मदा बचाओ आंदोलन विरुद्ध भारतीय संघ (२०००):**

सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की पाण्याचा अधिकार हा भारतीय संविधाना च्या कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकारात अंतर्भूत असलेला मूलभूत अधिकार आहे. या आणि इतर खटल्यांनी हे सिद्ध केले आहे की पाणी हे सार्वजनिक ट्रस्टमध्ये ठेवलेले एक सामुदायिक संसाधन आहे, जे नैसर्गिक जलसंपत्तीचे संरक्षण करण्याची राज्यावर कायदेशीर जबाबदारी आहे.



**हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस (प्रा.) लि. विरुद्ध पेरुमट्टी ग्राम पंचायत**

(२००५): केरळ उच्च न्यायालयातील हा खटला एका बहुराष्ट्रीय महामंडळाविरुद्ध स्थानिक समुदायाच्या पाण्याच्या अधिकाराबाबत होता. न्यायालयाने असे आढळून आले की कंपनीने भूजलाचा अतिरेकी उपसा केल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली, तो जनतेच्या स्वच्छ पाण्याच्या अधिकाराच्या किंमतीवर चालू राहू शकत नाही.

**एम.सी. मेहता विरुद्ध कमलनाथ (१९९७):**

या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय पर्यावरण कायद्याला सार्वजनिक ट्रस्ट सिद्धांत लागू केला. या निकालात असे घोषित करण्यात आले की राज्य हे जंगले आणि नद्यांसारख्या नैसर्गिक संसाधनांचे विश्वस्त आहे, जे जनतेच्या मोफत वापरासाठी आहेत आणि खाजगी मालकीमध्ये रूपांतरित केले जाऊ शकत नाहीत.

विमा दावे आणि करार अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कराराच्या वादां वरही न्यायालयांनी काम केले आहे.

ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध जे.के. सिमेंट वर्क्स (२०२०): भारतीय सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान मानक आग आणि विशेष संकट विमा पॉलिसी अंतर्गत 'पूर आणि पूर' म्हणून पात्र ठरते. यामुळे पूर नुकसान म्हणजे काय याचा अर्थ लावणे व्यापक झाले, विमा कंपन्यांना मुसळधार पावसाम ुळे होणाऱ्या पाण्याच्या साठ्यासाठी जबाबदार धरले.

**गुजरात राज्य विरुद्ध विजय मिस्त्री कन्स्ट्रक्शन**

आणि राजकमल बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेड (तारीख उपलब्ध नाही): एका न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढला की 'अभूतपूर्व पाऊस' सवलतीच्या कराराखाली फोर्स मॅजेऊअर घटना म्हणून पात्र ठरू शकतो. यावरून असे दिसून येते की करार कायद्यात, प्रकल्पाच्या वेळेत व्यत्यय आणणाऱ्या मुसळधार पावसा सारख्या घटना कायदेशीररित्या ओळखल्या जाऊ शकतात, जे कराराच्या विशिष्ट अटींवर अवलंबून असतात.

**'फ्लॅश दुष्काळ' चे कायदेशीर परिणाम**

मुसळधार पावसानंतर येऊ शकणाऱ्या फ्लॅश दुष्काळांशी संबंधित कायदेशीर समस्या अजूनही विकसित होत आहेत. अचानक येणारा दुष्काळ म्हणजे अचानक येणारा दुष्काळ, उच्च तापमान आणि मुसळधार पावसानंतर जलद वाहून जाणारे पाणी यासारख्या घटकांमुळे उद्भवणारा तीव्र दुष्काळ असतो, ज्यामुळे माती आणि भूजलाचे पाणी पुन्हा भरण्यापासून रोखले जाते.

**सरकारी कर्तव्य:** स्वराज अभियान विरुद्ध भारतीय संघराज्य यातील तत्त्वे लागू होतील,ज्यामुळे दुष्काळा च्या परिस्थितीत वेळेवर आणि प्रभावी आपत्ती व्यवस्थापन प्रतिसादांसाठी सरकार जबाबदार असेल.

**विमा दावे:** ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध जे.के. सिमेंट वर्क्स यासारख्या कायदेशीर उदाहरणांमुळे,अचानक येणाऱ्या दुष्काळामुळे जमिनी तील ओलावा कमी होणे आणि शेतीच्या नुकसानीशी संबंधित पिकांचे नुकसान किंवा माल मत्तेचे नुकसान झाल्याच्या दाव्यांचे समर्थन होऊ शकते.

**आंतरराज्यीय पाणी वाद:**

कर्नाटक आणि तामिळनाडू मधील कावेरी पाणी वादात पाहिल्याप्रमाणे, अचानक येणारा दुष्काळ आंतरराज्यीय पाणी वाद वाढवू शकतो, जिथे न्यायालयीन निर्णयांमध्ये मान्सूनच्या पावसाची वेळ आणि तीव्रता हे प्रमुख घटक आहेत असे कायदेशीर व अत्यंत म हत्त्वाचे मार्गदर्शन प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

# भाजपा प्रणित नवभारतीय शिववाहतूक संघटनेचे मध्यवर्ती कार्यालयाचे हाजी अरफात शेख यांच्या हस्ते उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भाजपा प्रणित नवभारतीय शिववाहतूक संघटनेतर्फे ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन हाजी अरफात शेख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सरचिटणीस विनय मोरेजी, आसेफ कुरैशी (जिल्हाध्यक्ष -छत्रपती संभाजीनगर) आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हाजी अरफात शेख मुंबई, महाराष्ट्र मधील भारतीय राजकारणी आहेत. ते भारतीय जनता पार्टी (भाजपा) चे सदस्य आहेत. सध्या ते महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष आहेत आणि महाराष्ट्र राज्य मुस्लिम खाटीक समाज युनिटचे अध्यक्ष आहेत. उद्घाटन प्रसंगी ते म्हणाले की, नवतरूणांनी शिक्षणाकडे वळाले पाहिजे. आर्थिक परिस्थिती खराब आहे. परंतु जर विद्यार्थ्यांला शिकण्याची इच्छा असेल आणि फक्त आर्थिक परिस्थितीच जर कारणीभूत होत असेल तर त्यांनी आमच्या या नवीन मध्यवर्ती कार्यालयात येवून चौकशी करावी तसेच सत्यता सांगावी त्यास योग्य प्रकारची मदत या कार्यालयातून होईल अशी ग्वाहीही महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख व छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष आसेफ कुरैशी यांनी दिली.

# राज्यभरात १० हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्रे; जिल्ह्यातील २९६ जणांचा समावेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अनुकंपातत्वारील गट क व गट ड मधील तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेले अशा तब्बल १० हजार ३०९ उमेदवारांना राज्यभरात शनिवार दि.४ रोजी नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत. त्यात जिल्ह्यातील २९६ जणांचा समावेश असून त्यात १५४ अनुकंपातत्वारील तर १४२ सरळसेवा भरतीतील उमेदवारांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील मुख्य कार्यक्रम हा शनिवार दि.४ रोजी सकाळी १० वा. संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे होणार आहे. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण होणार आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांना या कार्यक्रमास निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच म नपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस आयुक्त प्रवीण पवार,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच अन्य प्रशासकीय विभागप्रमुख या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. मुंबई येथून होणारा मुख्य सोहळा दुरदृष्यप्रणालीने याठिकाणी दाखवण्यात येणार असून म ुंबई येथील सोहळ्यासोबतच जिल्ह्यातील उमेदवारांना नियुक्तीपत्रे वाटप केली जाणार आहेत.

**राज्यभरातील १० हजार ३०९ जणांना नियुक्तीपत्रे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षानुवर्षे रखडलेली अनुकंपाप्रकरणे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्यानंतर आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, येत्या ४ ऑक्टोबर रोजी ५१८७ अनुकंपा उमेदवारांना शासकीय नोकरीची नियुक्तीपत्रे प्रदान केली जाणार आहेत. याचवेळी ५१२२ एमपीएससीद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे दिली जाणार असून, एकाच दिवशी १०,३०९ उमेदवार शासकीय नोकरीत दाखल होतील. अशाप्रकारचा हा इतिहासातील एक अनोखा कार्यक्रम ठरेल.

४ ऑक्टोबरला मुख्य कार्यक्रम हा म ुंबईत होईल आणि त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित असतील, तर पालकमंत्री आपआपल्या जिल्ह्यात नियुक्तीपत्रे वितरित करतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधी १०० दिवस आणि नंतर १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रमातील हा महत्त्वाचा टप्पा होता.

# ९ ऑक्टोबर रोजी ९ वाजून ९ मिनिटे आणि ९ सेकंदांनी एकाच वेळी, एकाच स्वरात 'भक्तामर' या मंगलकारी स्तोत्राचे पठण करून विश्वशांतीचा शंखनाद

## जाबिंदा ग्राउंडवर 'श्री भक्तामर दिवस' सोहळ्याची जय्यत तयारी; २५,000 हून अधिक भाविकांची उपस्थिती अपेक्षित!



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जैन धर्माचे महामंगलकारी स्तोत्र असलेल्या 'श्री भक्तामर स्तोत्रा' चा जागतिक स्तरावर प्रचार करण्यासाठी आणि संपूर्ण विश्वात शांती, सलोखा स्थापित करण्याच्या उद्देशाने, गुरुवार, ९ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे एका ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी, आंतरराष्ट्रीय स्तरावर 'श्री भक्तामर दिवस' म्हणून साजरा करण्याचा संकल्प आंतरराष्ट्रीय श्री भक्तामर प्रभावना संघ , सकल जैन समाज भारत ने केला आहे. बीड बायपास रोड, शाहनूर मियाँ दर्गा पुलाजवळ असलेल्या जाबिंदा ग्राउंडवर उभारण्यात आलेल्या भव्य, वॉटरप्रूफ 'श्री भक्तामर देशना मंडपात' हा सोहळा पार पडेल. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सकल जैन समाज बंधू-भगिनींनी या सामूहिक स्तोत्र पठण सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन जैन समाजाची एकता दर्शवावी, असे विनम्र आवाहन आयोजकांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या चातुमर्सानिमित्त सकल जैन समाजातर्फे विविध ठिकाणी विराजमान असलेल्या सर्व पूज्य साधू-संतांना निमंत्रण देण्यात आले आहे. यात परमपूज्य श्री डॉ. प्रणाम सागरजी गुरुदेव ससंघ, परमपूज्य जनसंत उपाध्याय श्री विरंजन सागरजी गुरुदेव ससंघ, आणि परमपूज्य चर्या शिरोमणि श्री प्रभाव सागरजी महाराज यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, बजाजनगर येथे विराजित असलेल्या पूज्य आर्यिका विपुलमती माताजी ससंघ तसेच श्रमणसंघीय उपप्रवर्तनी ओजस्वी वक्ता परम पूज्य श्री सुमनप्रभाजी म.सा. आदी




### 'भक्तामर वाले बाबा' म्हणून आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराज यांची ओळख

आंतरराष्ट्रीय 'श्री भक्तामर दिवस' संकल्पात 'भक्तामर वाले बाबा' म्हणून ओळखले जाणारे आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराज यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभले आहेत. आचार्यश्रींनी आपल्या प्रभावी वाणी आणि साहित्याच्या माध्यमातून भक्तामर स्तोत्राचे सामर्थ्य जगभर पोहोचवले आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच ९ ऑक्टोबर रोजी सामूहिक पठण करण्याचा हा संकल्प विश्वव्यापी झाला आहे. भारतासह ब्रिटन, अमेरिका, दुबई, कुवैत, जर्मन, जपान, साऊथ आफ्रिका अशा अनेक देशांतून भाविक ऑनलाइन माध्यमातून या सोहळ्यात सहभागी होणार आहेत, तसेच ४८ आचार्य भगवंत ऑनलाइन जोडले जाऊन स्तोत्रातील एकेक काव्य पठन करणार आहेत. भारतीय इतिहासात असा योग प्रथमच जुळून येत आहे, हे या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य आहे.

७, जिनशासन प्रभाविका परम पूज्य श्री प्रविणाजी म.सा. आदी ६, मधुर व्याख्यानी परम पूज्य श्री आराधनाश्रीजी म.सा. आदी २, परमपूज्य साध्वीवर्या श्री विरतीप्रभाश्रीजी म.सा. आदी ४, आणि पुनीतप्रज्ञाश्रीजी म.सा. आदी ३ या सर्व साधू आणि साध्वींना जैन समाजाने आदराने निमंत्रण दिले आहे. भक्तामर स्तोत्र हे आचार्य मानतुंग यांनी भगवान आदिनाथ (पहिले तीर्थंकर) यांच्या स्तुतीसाठी रचले आहे. हे केवळ एक स्तोत्र नसून ते शक्ति, भक्ती आणि मुक्ती चा संगम आहे. या स्तोत्राच्या प्रत्येक काव्यात (श्लोकात) विशेष मंत्रशक्ती दडलेली असून, नित्य पठणाने अनेकांचे रोग, शोक, भय आणि पीडा दूर होतात, अशी श्रद्धा आहे. हे स्तोत्र कुटुंबात सुख, शांती, समृद्धी आणि वैभव आणते, तसेच याच्या श्रवण-पठणाने आत्मिक शांती आणि बौद्धिक विकास देखील साधला जातो.

या सोहळ्याच्या तयारीसाठी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर अंतर्गत सर्व जिनालये, सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर आणि श्री भक्तामर प्रभावना रजत वर्षायोग समिती यांनी जय्यत तयारी केली आहे. कार्यक्रमाचा भव्य शुभारंभ सकाळी ठीक ७:०० वाजता होणार आहे. जाबिंदा ग्राउंडवरील या विशाल वॉटरप्रूफ देशना मंडपात २५,००० हून अधिक भाविक आणि समाज बांधवांच्या बसण्याची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे उपस्थितीचा हा आकडा एका ऐतिहासिक विक्रमाची नोंद करेल. या समारंभाचा मुख्य भाग म्हणजे सकाळी ठीक ९ वाजून ९ मिनिटे आणि ९ सेकंदांनी (९:०९:०९) होणारे सामूहिक स्तोत्र पठण. एकाच वेळी, एकाच स्वरात या मंगलकारी स्तोत्राचे पठण करून विश्वशांतीचा शंखनाद करण्यात येणार आहे.

भक्तामर दिवसाचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी ९ ऑक्टोबर रोजी आचार्य डॉ. प्रणाम सागरजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत एक मंगलमय धर्मयात्रा निघणार आहे. सकाळी ६:०० वाजता अरिहंत नगरच्या श्री युग प्रवर्तक आदिनाथ मंदिरातून सुरू होणारी ही रॅली, आचार्यश्रींच्या आशीर्वादाने परिसरातील सर्व मंदिरांना स्पर्श करेल. ही भक्तीपूर्ण यात्रा रोपळेकर चौक आणि शहानुरवाडी दर्गा मार्गे वाटचाल करत ठीक ७:०० वाजता जाबिंदा मैदानावर उपस्थित होईल. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. सोहळ्याची सुरुवात सकाळी ७:०० वाजता संगीत आणि स्वागत नृत्याच्या तालावर मंगलाचरण करून होईल. यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये चातुर्मास करणाऱ्या सकळ जैन समाजाच्या सर्व साधू-साध्वी भगवंतांचा मंगलमय उपदेश भाविकांना प्राप्त होईल. समारंभात महाराष्ट्रातील प्रसिद्ध संगीत समूह आपल्या सुमधुर संगीताने वातावरण अधिक भक्तीमय करेल. या संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्र संचालनाची जबाबदारी देशातील सुप्रसिद्ध, जैन धर्माचे सखोल ज्ञान असलेल्या आणि २००० हून अधिक कार्यक्रमांना आपल्या शब्दसंपदेने मंत्रमुग्ध करणाऱ्या, मुंबईच्या आर. जे. विधी जैन या सांभाळणार आहेत. तसेच, अनेक राजकारणी आणि विविध सामाजिक, संस्था-संघटनांचे पदाधिकारी यांची सन्माननीय उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. सामूहिक पठणानंतर प्रमुख अतिथींचे उद्बोधन होईल आणि सकाळी ठीक १०:३० वाजता सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता होईल. उपस्थितांसाठी कार्यक्रमस्थळी जलपान आणि महाप्रसादीची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.आंतरराष्ट्रीय श्री भक्तामर प्रभावना संघातर्फे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येक जैन कुटुंबाला 'जैन समाजाची एकता' आणि 'हर घर भक्तामर, घर घर भक्तामर' हा संकल्प पूर्ण करण्यासाठी ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ठीक ७:०० वाजता जाबिंदा ग्राउंडवर उपस्थित राहण्याची नम्र विनंती करण्यात आली आहे. तसेच, देश-विदेशातील सर्व समाज बांधवांनी आपापल्या मंदिर, स्थानक, उपाश्रयांमध्ये या सामूहिक भक्तामर पठण सोहळ्याचे आयोजन करावे, असेही आवाहन आयोजन समितितर्फे करण्यात आले आहे.

## भूमि लोकअदालत दि.१३ रोजी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी**

भूमि अभिलेख विभागाकडील नागरिकांच्या प्रलंबित अपील प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सोमवार दि.१३ पासून भूमि लोकअदालत आयोजीत करण्यात आली आहे. भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर येथे दि.१३ रोजी सकाळी ११ पासून ही लोकअदालत होईल. या लोकअदालतीचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख डॉ. विजय वीर यांनी केले आहे.

## 'वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील सर्व महाविद्यालयाचे परीक्षा निकाल आऊनलाईन करा'

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी**

मा कुलसचिव वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सर्व कृषी व इतर महविद्यालायाच्या शाखाचे निकाल आऊनलाईन जाहिर करण्यात यावे. कारण दिनांक २९/०९/२०२५ रोजी ईमेल संदेशा द्वारे प्राप्त पत्र उपरोक्त संदर्भ विषयांअन्वये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत येणाऱ्या सर्व कृषी व इतर महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या ६० हजार पेक्षा अधिक विद्यार्थीच्या वतीने विद्यापीठातील सर्व महाविद्यालयाचे परीक्षा निकाल आऊनलाईन प्रकाशीत करणे बाबत तातडीने लक्ष वेधून घेणारी विनंती करीत .असे मा. मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्र यांना सादर केलेलें आहे. यांचे पत्र २९/०९/२०२५ रोजीच्या ईमेल संदेशा द्वारे सादर केले आहे तसेच ते या पत्र. या कार्यालयात प्राप्त झाले आहे.

## गांधी जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर भारत पर्यटनतर्फे खुलताबाद येथे स्वच्छता अभियान



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर भारत पर्यटन कार्यालयाच्या वतीने, नगर परिषद खुलताबाद व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हा उपक्रम विशेष अभियान ५.० अंतर्गत पार पडला. महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वच्छ आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला वंदन म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. गांधीजींच्या आजीवन स्वच्छता आणि नागरिक जबाबदारीबाबतच्या विचारांना अभिवादन करण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेत स्थानिक नागरिकांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला व परिसर स्वच्छतेसाठी सक्रिय योगदान दिले. समाजातील सामूहिक प्रयत्न आणि सहभागामुळे स्वच्छ व निरोगी वातावरण घडविण्यास मोठी मदत होते, हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

## जाफराबाद तालुक्यात सततच्या पावसानं फळपीकांचं मोठं नुकसान पंचनामे करून नुकसान भरपाई द्या - संजय मोरे पाटील

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात सततच्या पावसाने इतर पिकांसह फळ पिकांचही मोठं नुकसान झालं असून या नुकसानग्रस्त फळबागांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यात यावी अशी मांगणी ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी केली आहे.

बुधवारी ( दि.१ ) श्री. संजय मोरे पाटील यांनी जाफराबादच्या तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की यावर्षी मे महिन्यापासून ते सप्टेंबर महिन्यांपर्यंत सतत पाऊस सुरू होता. त्यामुळे या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सततच्या पावसाने आंबा पिकाला ताण बसला नाही. त्यामुळे अद्याप पर्यंत आंब्याला मोहराची काडी तयार झाली नाही. लिंबू पिकाला ताण बसला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे तेही उत्पन्न बुडाले आहे. पेरू पिकाचीही तीच अवस्था आहे. सततच्या पावसाने आवळा पिकाचा मोहोर झडल्याने त्याला अल्पप्रमाणात फळे लागली आहेत. सर्वात जास्त कठीण अवस्था सीताफळ या फळिपकाची झाली आहे. सततच्या पावसाने सीताफळाला फुले लागली नाहीत. जी लागली ती टिकली नाहीत. जी टिकली ती बुरशीने काळी पडून गळून गेली. त्यातही थोडेफार आलेली फळे झाडावरच पिकून खाली गळून पडली. राहिलेली फळे झाडावरच तडकली. यामुळे फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या सर्व नुकसानग्रस्त फळबागांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी संजय मोरे पाटील यांनी निवेदनात केली आहे.

# जिल्ह्यातील ३०३ जणांना समारंभपूर्वक नियुक्तीपत्र प्रदान सरकारी नोकरी म्हणजे जनतेच्या सेवेची संधी- पालकमंत्री संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अनुकंपा तत्वारील गट क व गट ड तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या जिल्ह्यातील ३०३ उमेदवारांना आज सम रंभपूर्वक राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

राज्यभरात आज एकाच दिवशी १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. मुंबई येथे मुख्यसमारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली. हा सोहळा या कार्यक्रमात दुरदृष्यप्रणालीने दाखवण्यात आला.

आपल्याला मिळालेली सरकारी नोकरी ही जनतेच्या सेवेची संधी आहे, अशा शब्दात पालकमंत्री शिरसाट यांनी नवनियुक्त उमेदवारांना संबोधित केले.

जिल्ह्यातील मुख्य कार्यक्रम आज संत एकनाथ रंगमंदिर येथे पार पडला. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, आ. अनुराधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस आयुक्त प्रवीण पवार,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे तसेच अन्य प्रशासकीय विभागप्रमुख उपस्थित होते.

नवनियुक्त उमेदवारांशी संवाद साधतांना पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, शासनाने अवलंबिलेल्या नव्या कार्यपद्धती व नियम ांमध्ये सुधारणा केल्याने आज अनेकांच्या अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीचा प्रश्न निकाली निघाला आहे. त्यासाठी शासनाने अनेक वर्ष प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे निकाली काढली. इतक्या उमेदवारांना नियुक्तीपत्र माझ्या हस्ते प्रदान केले जात आहेत, हा माझ्या आयुष्यातील मोठा क्षण आहे. प्रत्येक नोकरीधारकावर आपल्या कुटुंबाची जबाबदारी आहे.

अनुकंपा तत्त्वावर ज्यांना नियुक्ती मिळाली आहे, त्यांनी आपले कुटुंब, आपल्यावर अवलंबून असणारे यांची काळजी घ्यावी. नोकरी प्राप्त केल्यानंतर परिश्रम आणि अभ्यास करुन आपल्या पदाचा आलेख उंचावत ठेवा. शासकीय नोकरी ही जनतेची सेवा करण्याची संधी आहे. आपल्याकडे आलेल्या माणसांचे काम करुन द्यावे त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ही सगळ्यात मोठा असतो.

आ. अनुराधा चव्हाण ह्यांनीही नवनियुक्त उमेदवारांचे शासकीय सेवेत स्वागत केले. आपली नोकरी करुन जनतेच्या सेवेचे समाधान प्राप्त करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

# मंगेश साबळे यांच्या समर्थनात रास्ता रोको....



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा तथा ओला दुष्काळ जाहीर करा यासह इतर म ागण्यांसाठी आमरण उपोषणावर असलेले मंगेश साबळे यांची दिवसेंदिवस तब्येत ढासळत असून प्रशासन या आंदोलनाकडे अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याकारणाने विविध पक्ष व संघटना यांच्या मार्फत शहरातील आंबेडकर चौक येथे रास्ता रोको करण्यात आला.

यावेळी मंगेश सावळे यांच्या मागण्या तात्काळ मान्य करा नाहीतर खुर्च्या खाली करा, आमचा दसरा दिवाळी कसा जाणार, सरकार आमची दिवाळी गोड करा, सरकारने माय बापाची भूमिका बजावावी असा सूर उमटला.

रास्ता रोको मध्ये शेतकरी पुत्र रविराज साबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष प्राध्यापक राहुल कुम ार ताठे, माजी नगराध्यक्ष बनेखा पठाण, राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष शेख शफिक, भाकपचे कॉम्रेड अनिस सय्यद, एडवोकेट शेख उस्मान, राष्ट्रवादी चे शेख अमान, संभाजी ब्रिगेडचे विजय पवार, काँग्रेस तालुकाध्यक्ष भास्कर घायवट, विकास जाधव, नारायण लोखंडे, साईनाथ पाटील, सुशील खरात सह प्रहार, शेतकरी संघटनाचे कार्यकर्ते तथा बाधित शेतकरी महिला या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या बघायला मिळाल्या. प्रभारी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत पालकमंत्र्यांशी फोनवरून चर्चा होऊन सुद्धा मंगेश साबळे यांनी उपोषण सोडण्यास नकार दिला आहे.

# बंजारा समाजाचा खुलताबाद शहरात एल्गार; एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मोर्चाद्वारे मागणी



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील बंजारा समाजाचे तांडे मुख्य वस्ती पासुन वेगळे वसलेले असले तरी हे लोक संस्कृती, एकात्मतेचे दर्शन देतात मात्र देश स्वतंत्र होवुन ७८ वर्षे झाले तरी बंजारा समाज अनुसूचित जमाती या आरक्षणा पासुन वंचित आहे,आता आरक्षण घेतल्याशिवाय समाज थांबणार नसल्याचे प्रतिपादन माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी शुक्रवारी (ता.तीन) खुलताबादेत केले. खुलताबाद तालुक्यातील गौर बंजारा समाजातर्फे शुक्रवारी (ता. तीन) आरक्षण मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला होता, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातून या मोर्चेला बारा वाजेच्या सुमारास सुरुवात झाली,तहसील कार्यालयाबाहेर या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले.यावेळी माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यासह समाजातील विविध प्रतिनिधींनी आरक्षणा बाबत आपली भूमिका समाजासमोर मांडली.

यानंतर समाजातर्फे विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार स्वरुप कंकाळ यांना देण्यात आले. हैदराबाद गाझीट नुसार राज्यातील गोर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात समाविष्ट करून आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसाठी खुलताबाद तालुक्यातील सकल गोर बंजारा समाजातर्फे शुक्रवारी (दि.३) एल्गार मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात हजारोंच्या संख्येने गोर बंजारा समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.महिलांची संख्या लक्षणीय होती. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या म हिलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तरुणांनी हातात संत सेवालाल महाराजांचा पांढरा ध्वज घेऊन हलकीच्या तालावर नृत्य करून मोर्चाला उत्साहपूर्ण सुरुवात झाली होती. यावेळी कोणत्याही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून दक्षता घेत खुलताबाद पोलीस प्रशासनातर्फे योग्य ती खबरदारी घेत पोलीस निरीक्षक धनंजय फराटे चांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त लावण्यात आले होते.

## म्हैसमाळ येथे राजपुत परदेशी समाजाचा दसरा मेळावा उत्साहात संपन्न

# १२ ठराव मंजूर करत समाजाने घेतला एकजुटीचा संकल्प

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**




खुलताबाद तालुक्यातील मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखले जाणाऱ्या म्हैसमाळ येथील राजपुत परदेशी समाजाचा दसरा महामेळावा गुरुवार, दि. २ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र म्हैसमाळ येथे मोठ्या उत्साहात व शांततेत संपन्न झाला. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या मेळाव्यात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते शस्त्रपूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.या महामेळाव्यात समाजाच्या हक्कासाठी एकूण १२ ठराव मांडण्यात आले व सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यामध्ये महाराणा प्रताप आर्थिक विकास मंडळाला एक हजार कोटी रुपये निधी देणे, राजपूत समाजाच्या वाडी-वस्ती विकासासाठी स्वतंत्र निधी,महाराणा प्रताप जयंती ९ मे रोजी साजरी करून शासकीय सुट्टी जाहीर करणे, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई तातडीने देणे, तसेच श्रीक्षेत्र म्हैसमाळ विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे यांसारख्या मागण्यांचा समावेश होता. मेळाव्यात बोलताना मान्यवरांनी समाज एकजूट होणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. दरवर्षी अशा स्वरूपाचा मेळावा आयोजित करून सम ाजातील विचारांचे आदानप्रदान घडवून आणण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. आयोजक समिती मार्फत मंजूर ठराव शासनाकडे सादर केले जाणार असल्याचेही सांगण्यात आले. मेळाव्याला कन्नडचे माजी आमदार उदयसिंग राजपुत, करणी सेनेचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. जीवन राजपुत, कवरसिंग बैनाडे, पदमसिंह राजपुत, सुभाष महेर, बिजु मारग, सुदाम राजपुत, सुरेश जोनवाळ,तोताराम बहुरे, शिवराणा सेवा संघाचे लालचंद ताटु, फूलसिंग राजपुत, विजयसिंग बिमरोट, रामसिंग बहुरे, धरमसिंग बिमरोट, जगतसिंग परीहार, चंदा राजपुत, गिताताई शेवगण, कविता काकरवाळ, अंजली कोकूल्डे राजपुत आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच अतिरिक्त अप्पर विभागीय आयुक्त खुशालसिंग परदेशी, सीईओ भागवत बिघोत यांची ही प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाभरातून दीड ते दोन हजार समाज बांधवांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष महेर यांनी केले तर आभार प्रदर्शन अमर परदेशी यांनी केले. ङ्गदरवर्षी हा महामेळावा आयोजित होणार असून, समाजाच्या न्याय आणि हक्कांसाठी शासन दरबारी मागण्यांचा पाठपुरावा केला जाईल, असे प्रतिपादन करणी सेना महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.जीवन राजपुत यांनी केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199